नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/१२/२०२५ (बुधवार )

---

## कळमेश्वर खुनाच्या प्रयत्न प्रकरणात साखळी पुरावे जोडुन मुख्य अग्निशस्त्र पुरवठादार आरोपीस नागपुर ग्रामीण पोलीसांनी जळगाव जामोद जि. बुलढाणा येथुन केले अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— बाल्या हिरामण गुजर, रा. बिरसा नगर,कुही फाटा ता उमरेड याला दिनांक २३/११/२०२५ रोजी दुपारी शंकरपट गावात आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ, रा. वार्ड क्र २ सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर तसेच त्याचे साथीदार यांनी जुन्या वादाच्या कारणावरून त्याला अग्निशस्त्राने गोळी झाडुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०९, ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३),१९० भा.न्या.सं सहकलम ३,४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर प्रकरणी पोलीसांनी १)परमेश्वर उर्फे देवा पिसाराम एकनाथ, २) काशिराम बापुराव एकनाथ,३) सावनाथ उर्फे सावन काशिनाथ एकनाथ ४) चंद्रशेखर उर्फे राहीन प्रेमलाल एकनाथ,५)प्रेमलाल बोहुरजी एकनाथ ६) तपन पिसाराम एकनाथ ७)आकाश पिसाराम एकनाथ ८) मोरेश्वर पिसाराम एकनाथ सर्व रा. सेलु, ९) रोशन रतन एकनाथ १०) दिनेश ईश्वर सनेश्वर आणि आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर, आणि आरोपी क्रं १२) जसपालसिंग चरतसिंग बावरी, वय २५ वर्षे,रा. वार्ड क्रं ६ गुरूनानक नगर, तळेगाव, ता. आष्टी, जि वर्धा यांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयात आरोपीतांकडुन प्राप्त माहीती आणि साखळी पुरावे जोडुन विशेष पथकाने आरोपी क्रं १३) करणसिंग चरणसिग चव्हाण, रा. निमखेडी ,जि बुलढाणा ह.मु. जळगाव जामोद, ता.जि. बुलढाणा याला दिनांक १६/१२/२०२५ रोजी जळगाव जामोद येथुन ताब्यात घेतले.**

नमुद प्रकरणात आरोपी चंद्रशेखर उर्फ राहीन प्रेमलाल एकनाथ याने सदर अग्निशस्त्र (देशी माउजर) आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर याचे कडुन विकत घेवुन आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ याला दिले होते. आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा याला अटक करण्यात आली होती. अटकेत असतांना त्याने पोलीसांना माहीती दिली की, सदर अग्निशस्त्र आरोपी क्रं १२) जसपालसिंग चरनसिंग बावरी, वय २५ वर्षे,रा. वार्ड क्रं ६ गुरूनानक नगर, तळेगाव, याचे कडुन विकत घेतले. त्यामुळे दिनांक ०८/१२/२०२५ रोजी आरोपी क्रं १२ जसपालसिंग चरनसिंग बावरी याला तळेगाव – आर्वी रोड,जि वर्धा येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली होती. आरोपी क्रं १२ याने मुख्य अग्निशस्त्र पुरवठादार आरोपी क्रं १३ करणसिंग चरणसिग चव्हाण याच्या मार्फतीने अग्निशस्त्र पाचोरी, जि बुऱ्हानपुर, राज्य मध्यप्रदेश येथुन आणल्याचे सांगितले होते. नमुद आरोपी कं १३ करणसिंग चरणसिग चव्हाण याला दिनांक १६/१२/२०२५ रोजी जळगाव जामोद येथुन ताब्यात घेतले. कळमेश्वर पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे. मा न्यायालयाने सदर आरोपीचा दिनांक १९/१२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.



करणसिंग चरणसिग चव्हाण

# केळवद पोलीस स्टेशन हद्‌दीतील अवैध दारू काढणारे तसेच विक्री करणारे ४ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार तसेच एका गुन्हेगाराला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन केळवद हदद्दीतील अवैध दारू काढणारे, विक्री करणारे तसेच अवैध दारू व्यवसायात सक्रिय ४ आरोपीतांना हद्दपार केले. तसेच एका आरोपीला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत स्थानबध्द केले.**

सराईत गुन्हेगार नामे १) संदीप दिलीप राजपुत, वय. ४१ वर्ष, २) दिलीप संतोष राजपुत, वय ४० वर्ष, ३) चंद्रपाल संतोष राजपुत, वय ६५ वर्ष, तिन्ही रा. पारधी बेडा, तिडंगी, ता कळमेश्वर, ४) मारोती शेषराव गुरटकर, वय ४२ वर्ष, रा. जोगा, माळेगाव,ता सावनेर आणि आरोपी क्रं ५) कैलास मारोती बुरलेवार, वय ४५ वर्षे,रा.वार्ड क्रं ५ केळवद, ता. सावनेर यांचेवर अवैध रित्या मोहाफुल दारू काढणे, विक्री करणे तसेच देशी दारू विक्रीचे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे गुन्हेगार क्रं १ ते ४ यांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव केळवद पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद चारही आरोपी यांना **६ महीन्यांकरीता** नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे. तसेच गुन्हेगार क्रं ५ कैलास मारोती बुरलेवार, वय ४५ वर्षे,रा.वार्ड क्रं ५ केळवद याचेवर एम.पी.डी.ए कायदयान्वये कार्यवाही

करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांच्याकडील स्थानबध्दतेच्या आदेशान्वये दिनांक १६/१२/२०२५ रोजी कैलास मारोती बुरलेवार याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



**संदीप दिलीप राजपुत**



दिलीप संतोष राजपुत



चंद्रपाल संतोष राजपुत



मारोती शेषराव गुरटकर



स्थानबध्द आरोपी कैलास मारोती बुरलेवार

## बकरी चोरीचे ६ गुन्हे उघड, ५ आरोपी अटक ,
## एक वाहन,बकऱ्या आणि रोख रक्कमेसह ४,८९,५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दिनांक ०५/१२/२०२५ रोजी नयाकुंड व चिचभवन गावातून ०७ बकऱ्या चोरी गेल्याच्या तक्रारीवरून पारशिवानी येथे बकरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण हे सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असतांना तपासादरम्यान तांत्रिक पुराव्यावरून आरोपीतांनी एका लाल रंगाच्या स्विफ्ट कार मधून बकरी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने सदर गुन्हयात वापरलेली स्विफ्ट कार ही कळमना येथील आरोपी नामे शक्ती शिंदे हा वापरत असून तिचा वापर तो रामटेक पारशिवानी नयाकुंड व नगरधन या परिसरातील बकऱ्या चोरी करण्यासाठी वापरत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली.

दिनांक १७/१२/२०२५ रोजी आरोपी नामे शक्ती प्रकाश शिंदे यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळमना येथुन ताब्यात घेऊन त्याच्याकडे सदर गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारांच्या मदतीने केल्याचे कबूल केले तसेच त्याच्याकडे रामटेक पोलीस स्टेशन व पारशिवानी पोलीस स्टेशन हद्दीतील इतर बकरी

चोरींच्या गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने पारशिवणी येथे ३ बकरी चोरीचे गुन्हे तसेच रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत ३ बकरी चोरीचे गुन्हे असे एकुण ६ गुन्ह्याची कबुली दिली. सदर गुन्हयात **१) शक्ती प्रकाश शिंदे, वय २१ वर्ष, रा. गौरीशंकर नगर जुना कामठी, रोड नागपूर, २) संजय शंकर कोहाड, वय २६ वर्ष , रा. दुर्गा किराणा स्टोअर्स जवळ , जुना कामठी रोड नागपूर ,३) मुकेश गोवर्धन शाहू, वय २३ वर्ष , रा. कलमना शनी मंदिर ,पाणीटंकी युथ फोर्स जुना कामठी रोड नागपूर ,४) रोहिदास श्रावण कोळवते, वय ३८ वर्ष राहणार गौरीशंकर नगर , जुना कामठी रोड नागपूर आणि ५) सुमित मुरलीधर दाढे ,वय २५ वर्ष ,रा.गौरीशंकर नगर पवनीकर** यांचे घर समोर जुना कामठी रोड नागपूर यांना कळमना भागतुन सापळा रचुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांकडुन १) एक लाल रंगाची स्विफ्ट कार क्रमांक एम एच ०२ बी जी ९१९९ किंमत ४,००,०००/—, २) चोरीच्या बकऱ्या विक्री करून मिळालेली रोख रक्कम ४४,५००/—, ३) तीन बकऱ्या किंमत १५,०००/— ४) आणि मोबाईल असा एकूण ४,८९,५००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा नोंद
१ आरोपी अटक
स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक १६/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन पारशिवणी हद्दीत पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सिंगोरी गावाजवळ नाकाबंदी केली असता संशयीत वाहन ट्रक क्र. एम एच ४० बी.एल. ५०३६ मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता **१) अजय शालीकराम बोहरे, वय २५ वर्ष, रा. लोणखैरी ता. कामठी** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. ट्रक मालकाचे नाव **२) स्वप्नील तळेकर, वय ४० वर्ष, रा. खापरखेडा** असे असल्याची माहीती प्राप्त झाली. वाहन मालकाच्या सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक करत असल्याची माहीती आरोपी क्रं १ याने दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष १)** ट्रक क्र. एम एच ४० बी.एल. ५०३६ किंमती २०,००००० /—रूपये व ०५ ब्रास रेती किंमती ३०,००० /—रूपये असा एकुण २०,३०,००० /—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहीता, खान खनिज अधिनियम, सहकलम सार्वजनिक मालत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम पर्यावरण सरंक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा नोंद
## उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :—** दिनांक १६/१२/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड हे त्यांच्या पथकासह पेट्रोलींग करीत असतांना त्यांना वाय पॉईट ,भिवापुर रोड, उमरेड येथे संशयीत वाहन १६ चक्का एल पी ट्रक क्र. एम एच २७ डी.एम. ५२७९ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. नमुद वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे दिसुन आले. वाहन चालक १) **शेख रेहान शेख रहीम, वय ३२ वर्ष, रा. खंडेलवार केशर जवळ, सरदार चौक, फेजदपुर बायपास कुंभारवाडी अमरावती** व सोबत **२) राहील अहमद फारूक अहमद, वय २५ वर्ष, रा. खंडेलवार केशर जवळ, सरदार चौक, फेजदरपुरा बायपास, कुंभारवाडा, अमरावती असे आरोपी मिळुन आले**. पोलीसांनी पंचासमक्ष १) १६ चक्का एल पी ट्रक क्र. एम एच २७ डी.एम. ५२७९ किमंती ३०,००,०००/—रूपये

आणि ११ ब्रास रेती किंमती ५५,०००/—रूपये असा एकुण ३०,५५,००००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहीता, कलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३(अ) सार्वजनिक मालत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण सरंक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १३ गुन्हे नोंद

दिनांक १६/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २०,५५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १३ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११०७० मिली देशी दारु, १५७ लीटर मोहाफुल दारू असा एकुण २०,५५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने